क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन (एकरकमी)/१७/२०१८ मुंबई, दि.१५/०२/२०१९२१

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे परिपत्रकीय आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/१७/२०१८, दि.०७/०४/२०१८ आणि
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन प्रणाली/९०/२०१८, दि.१७/०५/२०१८
३)क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन (एकरकमी)/१७/२०१८, दि.१९/१०/२०१९

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याबाबत

*****

**परिपत्रक**

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणालीव्दारे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना मंजूर केलेल्या अग्रिमाबाबतचे व्यवहार करण्यासाठी Paypro ही प्रणाली वापरण्याबाबतही घटक कार्यालयांना संदर्भाधिन परिपत्रकाव्दारे सूचना दिल्या आहेत. याबाबत घटक प्रमुखांचे लक्ष या कार्यालयाचे परिपत्रकीय आदेश दि.०७/०४/२०१८ कडे वेधण्यात येते. त्यामधील परिच्छेद १३ मध्ये नमूद केले आहे की, **घरबांधणी अग्रिमाच्या हप्त्यांची रक्कम कोणत्याही परिस्थितीत ५ तारखेपर्यंत वसूल करुन पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावी. मोड्यूलप्रमाणे मुद्दलाचे आणि व्याजाचे हप्ते वसूल करावेत. त्यांची नोंद न चुकता या मोड्यूलमध्ये घ्यावी.**

२. तथापि, असे निर्दशनास आले आहे की, बऱ्याच घटक कार्यालयांकडून कमी प्रमाणात रक्कम या कार्यालयास प्राप्त होते किंवा त्याबाबतची नोंद सॉफ्टवेअरमध्ये करण्यात येत नाही. घटक कार्यालयांकडून कमी प्रमाणात रक्कम प्राप्त होत असल्याने संबंधीत वित्तीय संस्थांना विहित वेळेत हप्ता देण्यास विलंब होत आहे. यामुळे संबंधीत वित्तीय संस्थांकडून अतिरिक्त दंड आकारण्यात येतो. तसेच, विहित वेळेत संबंधीत वित्तीय संस्थांना हप्त्यांची रक्कम न पाठविल्यामुळे संबंधीत वित्तीय संस्थेकडून अतिरिक्त व्याज आकारण्याची तरतूद आहे. यामुळे शासनावर अतिरिक्त भार निर्माण होणार आहे.

३. तरी, खालील नमूद घटक प्रमुखांना याव्दारे पुन्हा सूचित करण्यात येत आहेत की, अग्रिमधारकाकडून वसूल करण्यात येणारी रक्कम, कोणत्याही परिस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या घरबांधणी अग्रिमाच्या बँक खात्यात प्रत्येक महिन्याच्या ०७ तारखेपर्यंत जमा करावी. त्याच प्रमाणे युटीआर क्रमांक न चुकता सॉफ्टवेअरमध्ये अद्ययावत करावेत. तसेच, विहित कालावधीत घरबांधणी अग्रिमाच्या मुद्दलाची रक्कम या कार्यालयास Paypro प्रणालीव्दारे प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत प्राप्त न झाल्यास व त्याचे युटीआर क्रमांक सॉफ्टवेअरमध्ये अद्ययावत न केल्यास घटक कार्यालयातील संबंधित रोखपाल/संबंधित लिपिक यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी.

४. तसेच, शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६२/कोषा पशा-५, दि.०१/०४/२०२० अन्वये कोविडची स्थिती असल्यामुळे तसेच फक्त ५० टक्के व ७५ टक्के वेतन आकारले असल्यामुळे मुद्दल/व्याज वसुल करण्यात येऊ नये असे कळविले होते. परंतू, त्यानंतर शासनाने शासन निर्णय, क्र.संकीर्ण-१०२०/प्र.क्र.६२/२०/कोषा-प्रशा-५, दि.२८/०७/२०२० अन्वये ऑगष्ट २०२० मध्ये उर्वरित ५० टक्के व २५ टक्के वेतन अदा करण्यास मंजूरी प्रदान केली होती. त्यास अनुसरुन सदरचे वेतन संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना अदा करण्यात आले आहे. त्यामुळे आता संबंधित अग्रिमधारकाकडून त्यांच्या घरबांधणी अग्रिमाचा मार्च महिन्याचा प्रलंबित हप्ता माहे फेब्रुवारी २०२१ च्या वेतनातून वसूल करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

(संजीव कुमार सिंघल)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ नागरी हक्क संरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/विशेष कृती दल नागपूर/नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, गोरेगांव, मुंबई
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे /अ.अ.प्र.के., नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६/राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर/ धुळे
अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे / कोल्हापूर / औरंगाबाद / नांदेड / नागपूर / नाशिक / अमरावती
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / अमरावती / नागपूर / औरंगाबाद/कोंकण भवन, नवी मुंबई/नाशिक / कोल्हापूर



F:HBA18-19/General